

## अडचणीत आहात ? पैसे हवेत ?

# ऑनलाईन क्राऊडफंडिंग आहे ना !

**क्राऊडफंडिंग म्हणजे लोकवर्गणी. अलीकडे आर्थिक संकटात सापडलेल्या बांधकाम व्यावसायिक डी.एस.कुलकर्णी यांच्या मदतीसाठी क्राऊडफंडिंगची चर्चा सुरू झाली होती. ती योग्य होती का ? क्राऊडफंडिंग वेबसाईटचा लाभ कुणाला आणि कसा घेता येतो, ह्याचा माहितीपूर्ण रिपोर्ट.**

■ **सचिन परब**

गौरी सावंत यांच्याविषयी तुम्ही ऐकलं असेल. वाचलंही असेल. *कौन बनेगा करोडपतीमध्ये* अमिताभ बच्चन यांच्याबरोबर त्यांना पाहिलंही असेल. *विक्सच्या* नव्या जाहिरातीतही त्यांच्या अनोख्या मातृत्वाची कहाणी पाहिली असेल. त्या तृतीयपंथीय सामाजिक कार्यकर्त्या आहेत. मुंबईतल्या मालाड येथे मालवणी परिसरात त्यांची *सखी चारचौघी* नावाची संस्थाही आहे. तृतीयपंथीयांना सुरक्षित शरीरसंबंधांविषयी जागृती करण्याचं आणि त्यांना सन्मानाचं आयुष्य जगता येईल, यासाठी त्या प्रयत्न करत असतात. वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलींसाठी हक्काचं घर वसवण्याच्या स्वप्नांसाठी त्यांची धावपळ सुरू आहे.

आपल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाविषयी *चित्रलेखाशी* बोलताना **गौरी सावंत** सांगतात, 'बांगलादेशातून आलेल्या वीस वर्षांच्या एका मुलीला मी मुंबईत कामाठीपुऱ्यातल्या वेश्यावस्तीत शोधत होते. तेव्हा पाहिलेल्या दृश्याने मी हादरले. पडद्याआडच्या खोलीत ती तिच्या गिऱ्हाईकासोबत होती आणि तिचं काही महिन्यांचं तान्हं मूल तिच्या ओढणीशी खेळत होतं. माझी अस्वस्थता पाहून त्या मुलीने मला विचारलं, *तुला हवं असेल तर हिला घेऊन जा. नाहीतर ती मोठी होऊन शरीरविक्रीच्या याच चिखलात अडकणार आहे.* त्याच क्षणी मी वेश्यांच्या मुलींसाठी काम करायचं ठरवलं.'

त्यानंतर काही वर्षांनी गौरी सावंत यांनी *गायत्री* या सहा वर्षांच्या एका वेश्येच्या मुलीला सांभाळायला सुरुवात केली. आज ती सुरक्षित वातावरणात मोठी होतेय. तिचं शिक्षण उत्तम सुरू आहे. अशा आणखी काही मुलींचं संगोपन गौरी सावंत आणि त्यांची संस्था करतेय. त्यासाठी गायत्री हा जणू एक *पायलट प्रोजेक्टच* होता.

या प्रकल्पाच्या पुढच्या दिशेविषयी गौरी सावंत सांगतात, 'माझ्या मुलीला, गायत्रीला जे उत्तम संगोपन मिळालं, तो प्रत्येक मुलीचा हक्क आहे. शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलींचा हा हक्क नाकारला गेलाय. त्यांच्यासाठी हक्काचं आणि प्रेमाचं घर बनवण्यासाठी आम्ही कामाला लागलोय. पालघरला आम्ही जमीनही घेतलीय. तिथे दोन मजल्यांची इमारत असेल. पहिल्या मजल्यावर *किचन* आणि मोकळी जागा असेल. दुसऱ्या मजल्यावर बेड्स, टॉयलेट्स आणि मेडिकल रूम असेल. ६० ते ७० मुलींची तिथे व्यवस्था करण्याचा आमचा विचार आहे. तिथे यायची इच्छा असणाऱ्या १५ मुली माझ्या संपर्कात आहेत.'

या प्रकल्पाला गौरी सावंत यांनी *आजीचं*

घर असं छानसं नाव दिलंय. आपापल्या क्षेत्रात निष्ठेने काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना अशी स्वप्नं पूर्ण करण्यासाठी आयुष्य खर्ची घालावी लागतात. पण गौरी सावंत यांचं हे स्वप्न लवकरच पूर्ण होऊ शकेल. त्याचं श्रेय त्या *मिलाप* milaap.org या *क्राऊडफंडिंग वेबसाईटला* देतात. गौरी सावंत यांनी ७ मे २०१७ ला *मिलाप डॉट ओआरजी* या वेबसाईटवर *आजीचं घर*साठी मदत करण्याचं आवाहन केलं. आता एक वर्ष पूर्ण होण्यासाठी एक महिना बाकी असताना, त्यांना अपेक्षित असलेल्या ६२ लाखांपैकी ५० लाख ३६ हजार रुपये गोळा झालेत. विशेष म्हणजे, *वेबसाईटवर* या कामासाठी मदत करणारे धनाढ्य नाहीत, ती साधीच माणसं आहेत. ते १,००० रुपयांपासून यासाठी सहभाग देत आहेत.

*मिलाप* ही भारतातली आघाडीची *क्राऊडफंडिंग वेबसाईट* आहे. या *वेबसाईटमधून* ३१७ कोटींहून अधिक रुपयांची मदत गोळा करण्यात आल्याचा दावा करण्यात आलाय. मदत मिळालेल्या शेकडो गरजूंची *प्रोफाईलही* या *वेबसाईटवर* पाहायला मिळतात. त्यात नातेवाईकांच्या खर्चिक उपचारांसाठीची आवाहनं सर्वाधिक आहेत. त्यात सामाजिक संस्था आणि शिक्षणासाठी मदत हवे असणारे गरीब विद्यार्थीही आहेत.

कधी कुणाचा अपघात होतो, कधी शिक्षणासाठी मोठी संधी उपलब्ध असते, कधी अचानक गंभीर आजाराचं निदान होतं, कधी व्यवसायासाठी भांडवलाची गरज असते, अशावेळेस पैशांची गरज भासते. त्यासाठी मग नातेवाईक, मित्र किंवा शेजारी मदतीसाठी उभे राहतात. आता *सोशल मीडिया* आणि *नेटवर्किंगच्या* जमान्यात मदत देण्यासाठी तयार असणारे अनेक ओळखीचे आणि अनोळखी मित्र असू शकतात. त्यांना योग्य व्यक्तीपर्यंत नेण्याचं काम *क्राऊडफंडिंग वेबसाईट* करत आहेत.

जास्तीत जास्त लोकांकडून छोटी-छोटी रक्कम गोळा करून मोठा निधी उभा करण्याला *क्राऊडफंडिंग* म्हणतात. आपल्याकडे ही लोकवर्गणीची जुनी परंपरा आताही सुरू आहे. सहकारी संस्थांमध्येही निधीची उभारणी अशीच होते. मध्यंतरी अडचणीत आलेले बिल्डर डी. एस. कुलकर्णी यांना मदत म्हणून *क्राऊडफंडिंग* करण्याचं आवाहनही *व्हॉट्सअॅप, फेसबुक पोस्टमधून* सुरू होतं. या सगळ्या *क्राऊडफंडिंगला* आता *ऑनलाईन* स्वरूप मिळालंय. सामाजिक कामांच्या वर्गणीसाठी पावती पुस्तकं घेऊन घरोघरी आणि श्रीमंतांच्या ऑफिसांचे उंबरठे झिजवणं आता जुनं झालंय. त्यासाठी मदतीचा *ऑनलाईन फंडा* लोकप्रिय होतोय. पण ती काही समाजसेवा नाही. *क्राऊडफंडिंग वेबसाईट* चालवणं हा एक यशस्वी व्यवसाय आहे आणि *टेक्नॉलॉजीतले* तज्ज्ञ तरुण व्यावसायिक या नव्या व्यवसायातून आपली सामाजिक बांधिलकी सिद्ध करत आहेत.

*मिलाप* या अल्पावधीत यशस्वी झालेल्या *क्राऊडफंडिंग साईटचे* संस्थापक आणि *सीईओ* **मयुख चौधरी** *चित्रलेखाला* आपली भूमिका सांगताना म्हणाले, 'आम्ही काही समाजसेवक नाही, तसंच फक्त फायदा ओरबडणारे व्यावसायिकही नाही. आम्ही *टेक्नॉलॉजी बिझनेसमध्ये* आहोत. *मिलाप* हा *टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्म* आहे. आज *टेक्नॉलॉजीने* आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात शिरकाव केलाय. अशावेळेस एकमेकांना मदत करण्याची इच्छा असलेल्यांना *टेक्नॉलॉजीच्या* मदतीने सुविधा देणारी ही *वेबसाईट* आहे. त्याबदल्यात आम्ही आमचे खर्च चालवण्यासाठी लोकांकडून आलेल्या मदतीपैकी ५ टक्के रक्कम *फी* म्हणून घेतो.'

*मिलापची* सुरुवात कशी झाली ते सांगताना मयुख चौधरी म्हणाले, '२०१०च्या दरम्यान मी आणि माझ्यासोबत *मिलापची* स्थापना करणारा अनोज विश्वनाथन सौरऊर्जेवर चालणारे दिवे तयार करणाऱ्या एका *स्टार्टअपमध्ये* काम करत होतो. ते लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही देशभर






**तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्त्या गौरी सावंतः मिलाप या क्राऊडफंडिंग वेबसाईटमधून लोकांनी मला ५० लाख रुपयांची मदत दिलीय. त्यातून शरीरविक्रय करणाऱ्या महिलांच्या मुलींसाठी आजीचं घर उभं करतेय.**

## क्राऊडफंडिंगसाठीच्या टिप्स

- आपल्या आवश्यकतेनुसार योग्य ती *क्राऊडफंडिंग वेबसाईट* निवडा. सर्व *वेबसाईट* पाहून त्यात आपल्यासारखीच गरज असणाऱ्यांना मदत मिळाली असेल, तर त्याला अग्रक्रम द्या.
- *वेबसाईटवर अपलोड* करण्यासाठी चांगले फोटो काढून घ्या. आता कॅमेरातही उत्तम दर्जाचे फोटो येतात. ते अधिक आकर्षक करण्यासाठी फोनमध्येच एडिट करून घ्या.
- वाचणाऱ्याला मदत केल्याशिवाय राहावू नये, इतकं चांगलं आवाहन लिहून काढा. *पोस्ट* करण्याआधी ते वारंवार वाचा. त्यातल्या चुका काढा. इतरांना वाचून दाखवा.
- लिखित आवाहन शब्दबंबाळ नको, नेमकं हवं. त्यात चुकीची किंवा अतिरंजित माहिती देऊ नका.
- तुम्ही स्वतःच्या भाषेतूनही आवाहन लिहू शकता. मात्र जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी ते इंग्रजीतून दिल्यास उत्तम. त्यासाठी *वेबसाईट* तुम्हाला मदत करू शकते.
- तुम्ही तुमच्या मोबाईलमधून *व्हिडियो* बनवू शकत असाल तर उत्तम. *व्हिडियो*तून तुम्ही स्वतः केलेलं आवाहन परिणामकारक ठरू शकतं. त्यात वस्तुस्थिती दिसू शकते.
- फक्त *वेबसाईट*वर अवलंबून राहू नका. *सोशल मीडिया*तून ते *व्हायरल* करा. लोकांना प्रत्यक्ष भेटूनही मदतीचं आवाहन करत राहा.
- *क्राऊडफंडिंग वेबसाईट*चं नावीन्य अजूनही आहे. त्यामुळे तुम्हाला मिळत असलेल्या मदतीच्या बातम्या स्थानिक वर्तमानपत्रांत किंवा *केबल चॅनल*वर होऊ शकतात, हे विसरू नका.
- *क्राऊडफंडिंग वेबसाईट*च्या *हेल्पलाईन*वर किंवा तुमच्याशी संपर्कात असलेल्या *वेबसाईट*च्या माणसाशी सतत बोलत राहा.
- सुरुवातीला चांगला प्रतिसाद मिळाला नाही, तर निराश न होता नव्याने आवाहन करत राहा.



**मिलापचे सीईओ मयुख चौधरी :**
**आम्ही समाजसेवक नाही. आम्ही एकमेकांना मदत करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठीचा टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्म आहोत.**



**औद्योगिक गुंतवणूक तज्ज्ञ डॉ. संदीप कडवे :**
**आपल्याकडे क्राऊडफंडिंग वेबसाईटमधून नव्या उद्योजकांना नाही, तर गरजूंना मदत होते, हे आपल्या स्वभावानुसारच आहे.**

फिरायचो. तेव्हा आमच्या लक्षात आलं की, ग्रामीण भागात व्यावसायिक भांडवल उपलब्ध नाही. छोट्या-छोट्या व्यावसायिकांना भांडवली कर्ज सहज उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही २०१०ला *मिलाप*ची सुरुवात केली. पुढे २०१४ला त्याचं रूपांतर आम्ही सगळ्यांना सगळ्यांकडून मदत मिळवून देणाऱ्या *वेबसाईट*मध्ये केली.'

आज अशा किमान दहा – बारा प्रमुख *क्राऊडफंडिंग वेबसाईट* भारतात सुरू आहेत. त्यात *मिलाप*बरोबरच *विशबेरी, केटो, कॅटापूल्ट, फ्यूएल अ ड्रीम, बिटगिव्हिंग, फेअरसेंट, क्राऊडेरा, इम्पॅक्टगुरू* अशा *वेबसाईट* प्रसिद्ध आहेत. या सर्वच *साईट* विशी आणि तिशीतल्या तरुणांनी चालवलेल्या आहेत. *मिलाप*च्या मयुख चौधरींसारखीच प्रत्येकाच्या संस्थापकाची *वेबसाईट* सुरू करण्यामागची आपापली कहाणी आहे. त्यापैकी काही *वेबसाईट*चं स्वतःचं वैशिष्ट्य आहे. काही *एनजीओ* किंवा *स्टार्टअप*ना मदत मिळवून देण्यात पटाईत आहे, तर *विशबेरी*सारखी *साईट* फक्त कलाकारांनाच मदत मिळवून देते. *कॅटापूल्ट*ने *आम आदमी पार्टी*साठी निधी उभारण्यात मोठं यश मिळवलं होतं. हे अपवाद असले तरी बहुतांश *साईट*वर वैद्यकीय उपचारांसाठी *ऑनलाईन* मदत मागणाऱ्यांचीच संख्या जास्त आहे.

*क्राऊडफंडिंग वेबसाईट*वर मदत देणं आणि घेणं दोन्ही खूपच सोपं आहे. गरजूंसाठी *वेबसाईट*वर *स्टार्ट अ फंडरेझर* किंवा *क्रिएट अ कॅम्पेन* अशा लिंक असतात. त्यावर *क्लिक* केल्यानंतर फॉर्म भरण्याचे सोपस्कार म्हणजे थोडक्यात आवाहन लिहावं लागतं. संबंधित फोटो, व्हिडियो आणि कागदपत्रं जोडावी लागतात. *वेबसाईट*कडून त्याच्या खरेपणाची खातरजमा झाल्यानंतर एक *प्रोफाईल पेज* तयार होतं. त्यावर मदत करणाऱ्यांसाठीही एक *लिंक* असते. तिथे *ऑनलाईन पेमेंट* करता येतं. काही *साईट*कडून *चेक* ताब्यात घेण्याचीही सोय केलेली असते. या साऱ्याच्या बदल्यात संबंधित *वेबसाईट*ला मिळालेल्या मदतीतला ५ ते १५ टक्के हिस्सा द्यावा लागतो. काही *वेबसाईट*वर सुरुवातीला *फी* म्हणून १,००० ते ३,००० इतकी रक्कम भरावी लागते. शिवाय *सोशल मीडिया*वर विशेष मोहीम चालवण्यासाठीही वेगळी *फी* आकारली जाते. काही *वेबसाईट*वर मदतीसाठी निश्चित मुदत ठरवून दिली जाते.

*सोशल मीडिया*वर, विशेषतः *व्हॉट्सअॅप*वर आपल्याला मदतीचं आवाहन करण्याच्या *पोस्ट* नेहमी येत असतात. अनेकदा ही आवाहनं बनावटच असतात. पण ही आवाहनं एकाच वेळेस लाखो लोकांपर्यंत पोहोचतात. त्यापैकी काहीशे लोक जरी या

## या वेबसाईट पाहायलाच हव्यात

■ मिलाप milaap.org : गावागावापर्यंत पोहोचलेली आणि सोशल मीडियावर सक्रिय असणारी ही वेबसाईट सर्वात लोकप्रिय असल्याचा दावा करते.

■ विशबेरी wishberry.in : संगीत अल्बम, सिनेमा, डॉक्युमेंट्री अशा कलाकृती बनवण्यासाठी रसिकांचा आश्रय मिळवून देणारी ही वेबसाईट वेगळी आहे.

■ केटो ketto.org : अभिनेता कुणाल कपूर सहसंस्थापक असणाऱ्या या साईटने उद्योजकांपासून गरजूंपर्यंत अनेकांना कोट्यवधींची मदत केलीय.

■ कॅटापूल्ट catapoolt.com : विशेषतः स्टार्टअप्सना भांडवल उभं करून देण्याचं काम कॅटापूल्टने केलंय. त्यांनी आप्सासाठीही निधी गोळा केलाय.

■ फ्युएल अ ड्रीम fueladream.com : एक स्वप्नं फुलवण्याचं आवाहन करणारी ही वेबसाईट विशेषतः नव्या उद्योजकांना आणि सामाजिक संस्थांना मदत मिळवून देते.

■ बिटगिव्हिंग bitgiving.com : विविध प्रकारच्या सामाजिक कामांच्या मागे आर्थिक पाठबळाची गरज पूर्ण करणारी वेबसाईटही लोकप्रिय आहे.



फसवणुकीला बळी पडले, तरी त्यातून लाखोंचा चुना लागतो. ही फसवणूक टाळण्यासाठी विश्वासार्हता तपासण्याची यंत्रणा असणाऱ्या क्राऊडफंडिंग वेबसाईट वापरात आल्यात. या साईट मात्र फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर या सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून मदत मिळवतात.

आर्टिस्टशेअर डॉट कॉम ही अमेरिकेतील वेबसाईट पहिली क्राऊडफंडिंग वेबसाईट मानली जाते. आजही ही वेबसाईट एक यशस्वी क्राऊडफंडिंग वेबसाईट आहे. ब्रायन कॅमेलियो या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी शिकलेल्या संगीतकाराने २००१च्या दरम्यान ही वेबसाईट सुरू केली. संगीतकारांचं दुःख माहीत असलेल्या कॅमेलियोने आपल्यासारख्या शेकडो कलाकारांना लोकांकडून पैसे मिळवून दिले. त्यामुळे कलाकारांची कला लोकांसमोर आलीच. त्याचबरोबर लोकांनाही पठडीपेक्षा वेगळ्या कलेचा आस्वाद घेता आला. आर्टिस्टशेअरमुळे निर्माण झालेल्या अल्बमना ग्रॅमी अॅवार्डसह अनेक महत्त्वाचे पुरस्कार मिळालेत. या यशामुळे ब्रायन कॅमेलियो फादर ऑफ ऑनलाईन क्राऊडफंडिंग म्हणून ओळखला जातो.

परदेशात आजही क्राऊडफंडिंग प्रामुख्याने उद्योजकांना मदत करण्यासाठी आणि भांडवल उभारणीला कर्जरूपी मदत करण्यासाठी वापरलं जातं. आपल्याकडे मात्र क्राऊडफंडिंग वेबसाईटचा वापर वैयक्तिक किंवा सामाजिक मदतीसाठीच मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो.

औद्योगिक गुंतवणूक क्षेत्रातले आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ **डॉ.संदीप कडवे** ही मर्यादा नोंदवताना सांगतात, 'उद्योजकाच्या ओळखीचे नसलेले अनेक गुंतवणूकदार आपापल्या ऐपतीप्रमाणे त्या व्यवसायात गुंतवणूक करतात, तेव्हा त्याला आपण क्राऊडफंडिंग म्हणू शकतो. क्राऊडफंडिंग करणाऱ्याला कोणत्याही आर्थिक फायद्याची किंवा व्यवसायावरील नियंत्रणाची अपेक्षा नसते. फक्त एका चांगल्या व्यावसायिक संकल्पनेच्या किंवा व्यावसायिकाच्या पाठीशी उभं राहण्याची त्यामागे भावना असते. आपल्याकडे सामाजिक कामांना मदत करण्याचं माध्यम म्हणूनच क्राऊडफंडिंग वेबसाईटकडे पाहिलं जातं. त्याचं क्राऊडफंडिंग हे नाव आता रूढ झालं असलं, तरी ती सामाजिक मदत आहे, फंडिंग नाही. पूर्वी आपले मित्र किंवा नातेवाईक अडचणीच्या काळात मदतीसाठी उभे राहायचे, त्याचं हे आधुनिक युगातलं ऑनलाईन रूप आहे.'

उद्योगांमधल्या क्राऊडफंडिंगविषयी संदीप कडवे सांगतात, 'आपल्या देशातली मानसिकता पाहता सध्याचं क्राऊडफंडिंग वेबसाईटचं स्वरूप स्वाभाविक मानायला हवं. कारण नव्या उद्योजकाने आपल्या आयडिया प्रत्यक्ष व्यवसायात उतरवल्यानंतर त्याचं यश-अपयश पाहूनच आपल्याकडे गुंतवणूक केली जाते. तसंच डी.एस. कुलकर्णींसारख्या अडचणीत आलेल्या उद्योगाला क्राऊडफंडिंग उपयुक्त ठरू शकलं नसतंच. कारण अशावेळेस फक्त आर्थिक मदतीची नाही; तर तज्ज्ञांच्या देखरेखीखाली संपूर्ण फेररचनेची गरज असते.'

मोबाईलमधून इंटरनेट आणि त्यातून सोशल मीडिया गावोगाव पोहोचत आहे. त्यामुळे ज्यांच्यापर्यंत गरजेला कोणतीही मदत मिळत नाही, अशा लोकांपर्यंत मदत पोहोचवण्यासाठी क्राऊडफंडिंग वेबसाईट महत्त्वाच्या ठरू लागल्या आहेत. आजच त्यातून कुणाचा प्राण वाचतोय, कुणाची स्वप्नं पूर्ण होत आहेत, कुठे सामाजिक काम उभं राहतंय. त्याचबरोबर आपल्या देशातील गरजवंतांची मोठी संख्या लक्षात घेता, हा उपक्रम उद्योग म्हणूनही मूळ धरू लागलाय. त्यातून आता भारतात दरवर्षी कोट्यवधींची उलाढाल होऊ लागलीय. हे होत असताना या साईट आज लाखो लोकांना मदत देण्या-घेण्यास उद्युक्त करत आहेत, हे महत्त्वाचं आहे. ■